18 NOV 2018

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ**
**वर्धापनदिन विशेष**

# गुणवत्ता, दर्जा व कौशल्यातूनच प्रगती

**शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापनदिन रविवारी (ता. १८) साजरा होत आहे. उच्चशिक्षणाची मातृसंस्था असलेल्या विद्यापीठाने गेल्या पाच दशकांहून अधिक कालावधीत वर्षागणिक प्रगतीचे एकेक टप्पे पार केले आहेत. शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहात संशोधन, तंत्रज्ञान, नव्या संधींची कवाडे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय करार, नवे अभ्यासक्रम या पैलूंची कास धरली आहे. शिक्षणातील गुणवत्ता, दर्जा व कौशल्य या त्रिसूत्रीतूनच विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख उंचावण्यावरच भर दिल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. वर्धापनदिनानिमित्त त्यांच्याशी अनुराधा कदम यांनी साधलेला संवाद**



**टॉकटाइम**

■ **वर्धापनदिनाच्या निमित्ताने गेल्या वर्षभरातील विद्यापीठाच्या प्रगतीबाबत काय सांगाल?**

यंदा शिवाजी विद्यापीठ ५७ व्या वर्षात पदार्पण करत आहे. एखादे विद्यापीठ स्थापन होणे व अर्धशतकाचा कालावधी पार करणे हा खूप मोठा प्रवास आहे. गेल्या वर्षभरात शिवाजी विद्यापीठात सर्वच पातळीवर भरीव काम झाले आहे, हे सांगताना अतीव आनंद होत आहे.

रँकिंगमध्ये विद्यापीठाने प्रगती केली आहे. देशातील पहिले सायबर सिक्युरिटी केंद्र विद्यापीठात स्थापन झाले आहे. कौशल्याधारित अभ्यासक्रमांना चालना देत विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील नव्या संधी मिळाव्यात यासाठी इन्क्युबेशन सेंटर कार्यान्वित झाले आहे. या केंद्रासाठी मिळालेल्या पाच कोटी रुपयांच्या निधीचे पुढच्या पाच वर्षासाठी नियोजन केले आहे. मानसशास्त्रातील नवे अभ्यासक्रम व पदव्युत्तर पदवी विभाग सुरू करण्यात आला आहे. विद्यापीठातील रूसा या प्रकल्पासाठी आलेल्या निधीतून राबवण्यात आलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध झाल्या. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या निधीतून आयोजित केलेल्या कार्यशाळा, विकासप्रकल्प यांचा आलेख चढता राहिला आहे.

■ **विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासाला प्राधान्य देण्यासाठी काय नियोजन केले आहे?**

विज्ञान तंत्रज्ञान प्रगती करत असताना शैक्षणिक व्यवस्थाही बदल आहे. ज्या क्षेत्रात प्रचंड स्पर्धा सुरू आहे व यामध्ये टिकून रहायचे असेल तर शिक्षणासोबत कौशल्याचा आधार घ्यावा लागेल. केंद्र व राज्य सरकार यांनी या संबंधात विविध योजना राबवलेल्या आहेत. विद्यापीठ पातळीवर सर्व विद्यार्थ्यांच्या स्कील मॅपिंगची व्यवस्था महत्त्वपूर्ण आहे. ज्यामुळे विद्यार्थी नोकरीक्षम होतील ज्याला आपण एम्प्लॉएबल ग्रॅज्युएट म्हणतो. आणि त्यांना त्यांचे मूळ डिग्री आणि स्कील डेव्हलपमेंट कार्यक्रमांमधून त्यांना नोकरी मिळू शकेल. जॉब रेडी स्कील या माध्यमातून कमी करता येऊ शकतो आणि अशी मागणी सातत्याने उद्योग समुहाकडून होत आहे. इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उद्योजक निर्माण करणारी यंत्रणा भविष्यात प्रचंड प्रभावी ठरणार आहे.

■ **संशोधनासाठी विद्यापीठात कोणकोणत्या योजना राबविल्या आहेत?**

महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस लागावी यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी अनुदान देणारे शिवाजी विद्यापीठ देशातील एकमेव विद्यापीठ आहे. तसेच यंदाच्या वर्षभरात २६ संशोधनप्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. पर्यावरण, वनस्पतीशास्त्र, समाजशास्त्र, अभियांत्रिकी, या विषयातील संशोधन प्रकल्पांनी समाजाभिमुखता सिद्ध केली आहे. तर देशात ४९ पेटंटसह शिवाजी विद्यापीठाने अव्वल स्थान मिळवले आहे. कोल्हापूरची ओळख असलेल्या कोल्हापूरी चप्पल क्लस्टरसाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे.

■ **२०१९ ला होणाऱ्या नॅक मूल्यांकनासाठी विद्यापीठाने काय तयारी केली आहे?**

२०१९ ला शिवाजी विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन होणार आहे. नॅकच्या निकषांना पात्र ठरण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन सुरू आहे. शैक्षणिक दर्जा निश्चित करणारे आयएसओ मानांकन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठाचा संगणकीय डेटा सुरक्षित रहावा, यासाठी आवश्यक असलेले आयटी ऑडिट करण्याचा प्रोजेक्टही कार्यान्वित करण्यात येणार आहे. विद्यापीठाद्वारे करण्यात आलेले संशोधनप्रकल्प इंडस्ट्रीच्या माध्यमातून उपयोजित स्तरावर सुरू करण्यात आल्याचा डेटा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. विद्यापीठाने तयार केलेले अकाउंट मिटिंग सॉफ्टवेअरचे अनुकरण करण्यासाठी करण्यात आलेला करारही या निकषात महत्त्वाची भूमिका बजावणारा ठरणार आहे.

| | |
|---|---|
| विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये | २९३ |
| विद्यापीठात शिक्षण घेणारे विद्यार्थी | ३ लाख |
| विद्यापीठातील एकूण अधिविभाग | ४० |
| सध्या सुरू असलेले संशोधन प्रकल्प | २६ |
| राष्ट्रीय सामंजस्य करार | ४४ |
| आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार | १८ |

**विद्यापीठ व इंडस्ट्रीसोबत करार**

४८
इंडस्ट्री कन्सलटन्सी

३६
तंत्रज्ञान समन्वय

२२१
इंडस्ट्रीसोबत सामंजस्य करार

१५७
इंडस्ट्रीसोबत काम करत असलेले प्राध्यापक

११७१
काम करत असलेले विद्यार्थी

**तीन जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या शिवाजी विद्यापीठामुळे खेडोपाडी शिक्षण पोहोचले. सध्या संशोधन आणि शैक्षणिक गुणवत्तेत महत्त्वाच्या विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त घेतलेला आढावा...**



## प्रगतीच्या ज्ञानवाटा

### विद्यार्थीकेंद्रित प्रकल्प

- करिअर व मार्गदर्शन केंद्र : १
- दरवर्षी लाभ घेणारे विद्यार्थी : ७०
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे : ७
- कौशल्याधारीत अभ्यासक्रम : १०३
- दरवर्षीकमवा व शिका योजनेचा लाभ घेणारे विद्यार्थी : ६००

### गेल्या वर्षात खेळातील विद्यापीठाची प्रगती

- राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थी : १२०
- राष्ट्रीय स्पर्धांमधील सहभागी विद्यार्थी : ५४५
- आशियाई स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी : १

### पेटंटची संख्या

- मान्यताप्राप्त पेटंट : ४९
- प्रकाशित पेटंट : १९
- हक्कप्राप्त पेटंट : ३५

३५
विद्यापीठ व स्थानिक संस्थांशी करार

९५
विद्यापीठ व पर्यटन संस्थांशी करार

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा रविवारी (दि.१८) वर्धापनदिन साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापनदिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा रविवारी (दि. १८) ५६ वा वर्धापनदिन साजरा होत आहे. यानिमित्त गुणवंत शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व गुणी पाल्य आदींचा विशेष सन्मान केला जाणार आहे. या कार्यक्रमास बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. पी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ इमारतीला रोषणाई



दीपक जाधव

शिवाजी विद्यापीठाचा आज, रविवारी होणाऱ्या ५६ व्या वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस शनिवारी आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. वर्धापनदिनाच्या पूर्व संध्येला विद्यापीठाची प्रशासकीय इमारत रोषणाईने उजळून निघाली होती.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त इमारतीस केलेली रोषणाई. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

# विद्यापीठाचा आज वर्धापन दिन

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापन दिन उद्या (ता. १८) होत असून, मुख्य इमारतीला केलेल्या रोषणाईने परिसर उजळून गेला. उद्या सकाळी साडेआठला ध्वजवंदन होणार आहे. जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. पी. पी. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत राजर्षी शाहू सभागृहात सकाळी पावणेनऊला कार्यक्रमास सुरवात होईल.

दरवर्षीप्रमाणे यंदाही गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवकांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. त्याची घोषणा उद्याच होईल. त्यानंतर विजेत्यांना पुरस्कार प्रदान केला जाईल. पुरस्काराची रक्कम यंदा विद्यापीठाने वाढवली आहे. त्याची अंमलबजावणीही उद्या होईल.

पुढारी

क

जिज्ञासा

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्राच्या कोल्हापूर शहरातील विद्यापीठ आहे. याचे उद्घाटन १८ नोव्हेंबर १९६२ रोजी त्या काळचे राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. हे महाराष्ट्रातील सात विद्यापीठांपैकी एक आहे. शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील सर्वात प्रगत विद्यापीठांपैकी एक आहे. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर या चार जिल्ह्यांच्या उच्च शिक्षणाशी निगडित आहे. विद्यापीठाच्या आवारात छत्रपती श्री शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा विराजमान आहे. निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासक्रमाशी निगडित अधिविभागाच्या वास्तू या आवारात असून त्याभोवती सुंदर बाग बनविली आहे व नैसर्गिक वातावरण निर्मिती केली आहे. तसेच ग्रंथालयाची देखणी इमारत आहे. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. आप्पासाहेब पवार यांनी कार्यभार सांभाळला होता.

लोकमत

## दैनंदिनी



- **वर्धापन दिन :** शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध सत्कार. **प्रमुख पाहुणे :** प्रा. डॉ. पी. पी. पाटील, कुलगुरु, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. **अध्यक्ष :** कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे, शिवाजी विद्यापीठ. **वेळ :** सकाळी ८.४५ वा. **स्थळ :** राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ.

18 NOV 2018
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जाहीरनाम्यांत स्त्री आरोग्याचा समावेश हवा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'स्त्री आरोग्याकडे राजकीय प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे. यासाठी स्त्रियांच्या आरोग्याबाबत विचारमंथनाची प्रक्रिया सुरू होण्याची गरज आहे. २०१९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीतील जाहीरनाम्यात स्त्रियांच्या आरोग्याच्याचा समावेश व्हायला पाहिजे. यासाठी महिला संघटना, विविध आरोग्य गटांनी दबावगट तयार करणे गरजेचे आहे,' असा सूर राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेत व्यक्त करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व आरोग्य हक्क परिषद संयोजन समितीतर्फे भाषा भवन येथील सभागृहात वक्त्यांनी या परिषदेत मते व्यक्त केली. यावेळी दलित, वंचित, शोषित समुहातील महिलांच्या आरोग्य आणि सन्मानाने जगण्याच्या अधिकाराची मागणी करण्यात आली.

मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस म्हणाले, 'स्त्रीला आवश्यक असणारे अवकाश मिळत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेचे वर्चस्व घालवण्यासाठी स्त्रियांचा आदर आणि सन्मान करणारी नवी भाषा तयार करावी लागणशर आहे. आजकालच्या टीव्ही वाहिन्यांवरील मालिका राजरोसपणे स्त्रीचे वस्तूमूल्य अधोरेखित करत आहेत. यासाठी स्त्रियांनी स्वतःला झोकून देऊन लिहतं व्हायला हवे. पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्री विश्वाला वाचवण्यासाठी संविधान महत्त्वाचे आहे. त्यासाठी खेड्यातल्या सामन्य स्त्रीला चळवळीशी जोडले पाहिजे.'

**विद्यापीठातील महिला आरोग्य हक्क परिषदेत सूर**



शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन व आरोग्य हक्क परिषद संयोजन समितीतर्फे आयोजित राज्य महिला आरोग्य हक्क परिषदेच्या समारोपप्रसंगी बोलताना ज्येष्ठ लेखक प्रा. राजन गवस.

रंजनाताई कान्हेरे म्हणाल्या, 'महिलांच्या आरोग्यासाठी २०१४ नंतरची सामाजिक आणि राजकीय स्थिती गंभीर बनली आहे. पूर्वी निषेधाचा आवाज देता येत होता, मात्र आता तो आवाज देण्याची स्थिती राहिलेली नाही. त्यामुळे देशाला निर्माण झालेला फॅसिझमचा धोका लक्षात घेऊन धर्मनिरपेक्षता टिकून ठेवण्यासाठी दीर्घ पल्ल्याचे उपाय योजले पाहिजेत.'

मेधा काळे म्हणाल्या, 'या परिषदेमुळे आरोग्य धोरणांचे विश्लेषण करणारा मंच स्त्रियांना उपलब्ध झाला आहे. यापुढे स्थानिक स्तरावरील आरोग्य यंत्रणेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करायला हवा. गावपातळीवर चांगल्या आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी लावून धरली पाहिजे.'

मीना शेषू म्हणाल्या, 'परिघाबाहेरच्या लोकांना आजच्या समाजव्यवस्थेत स्थान दिले जात नाही. या पहिल्या आरोग्य परिषदेत अशा लोकांना सहभागी होण्याची संधी मिळाल्याने त्यांना आत्मविश्वास मिळाला आहे. आजकाल संविधान बदलण्याची भाषा केली जाते पण ते कधीही शक्य होणार नाही.'

मेघा पानसरे म्हणाल्या, 'लोकशाही व्यवस्थेत आजच्या महिलांनी स्वतःचा आवाज उठवण्याची तयारी ठेवावी. यासाठी चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांना सामर्थ्यवान बनवण्यासाठी यापुढे प्रयत्न केला जाईल. स्त्री आरोग्याच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे प्रश्न सुटण्यासाठी पुढाकार घेण्यासाठी समाजाने पुढे व्हावे.'

या परिषदेसाठी दिवसभरातील विविध सत्रांतील व्याख्यानांना महिलांची गर्दी होती.

सकाळ

# शाहू शिक्षण शिष्यवृत्तीसाठी ३९ हजार अर्ज

## राज्यात कोल्हापूर विभाग टॉप; गतवर्षीपेक्षा अर्जांत अडीच पट वाढ

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकडून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी ३९ हजार ४५८ अर्ज शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे आले आहेत.

गतवर्षी १६ हजार ७५२ अर्ज दाखल झाले होते. यंदा अर्जांत अडीच पट वाढ झाली आहे. ते पुणे शिक्षण संचालक कार्यालयाकडे पाठवले आहेत. विशेष म्हणजे कोल्हापूर विभाग महाराष्ट्रात अर्जांच्या संख्येत टॉप ठरला आहे. राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील



विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे. आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निश्चित झाली आहे. व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशित विद्यार्थी योजनेतून वगळले आहेत. गतवर्षी योजनेचा लाभ फार कमी विद्यार्थ्यांना

**विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अर्ज असे:**

- **कोल्हापूर - १५ हजार ७७८**
- **सातारा - १३ हजार ८७६**
- **सांगली - ९ हजार ८०४**

मिळाल्याने विविध संघटनांकडून शिक्षण संचालक कार्यालयाकडे त्याबाबत विचारणा झाली. यंदा शिवसेनेने विद्यापीठ प्रशासन, शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी यांच्यासमवेत बैठक घेऊन योजनेतील त्रुटी निदर्शनास आणून दिल्या. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासमवेत नॅनो टेक्नॉलॉजीच्या सभागृहात पुन्हा बैठक झाली. त्यातही योजनेच्या अंमलबजावणीवर

**शिक्षण सहसंचालक कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी परिश्रम घेतले आहेत. त्याचा परिणाम म्हणून अर्जांची संख्या वाढली आहे. चार हजार आठशे अर्ज शिक्षण संचालक कार्यालयाकडे पाठवले असून, संबंधित विद्यार्थ्यांना लवकरच शिष्यवृत्ती मिळेल.**

**- डॉ. अजय साळी,**
शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर.

ऊहापोह झाला. त्यानंतर योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेगाने चक्रे फिरली. त्याचा परिणाम म्हणून कोल्हापूर विभागात अर्जांची संख्या वाढली आहे.

# पंडित नेहरू यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये नेहरू अभ्यास केंद्रातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते

My Kolhapur Edition